तहसिलदार, मंगरुळपीर यांचे कार्यालय,मंगरुळपीर जि. वाशिम

MRC-81/शेलगाव/02/2020-21

सुधारीत बांधकाम परवाना

प्रति,

श्री आनंद रमेशचंद्र जाखोटीया
रा ता मंगरुळपीर जि.वाशिम

विषय :- ग्राम पंचायता शेलगाव येथील क्षेत्रातील घर बांधकाम करण्यास परवानगी देणे बाबत.

संदर्भ :- 1.आपला दि. 01/08/2020 रोजीचा अर्ज.प्लॉट क्र./घर क्र 06 क्षेत्र 2173.52 चौमी

उपरोक्त विषयी संदर्भिय पत्रान्वये आपण अर्जात नमुद केल्यानुसार ग्राम पंचायत, शेलगाव ता मंगरुळपीर येथील गट क्र 31 मधील अकृषक लेआऊट मधील प्लॉट क्र 06 क्षेत्र 2173.52 चौमी ची नोंद आहे. सदर जागेमध्ये बांधकाम करण्याची परवानगी देण्याची विनंती केली आहे.

सदरील अर्जान्वये तलाठी मौजे शेलगाव यांचा अहवाल प्राप्त तसेच जाहिरनामा प्रसिध्द करुन अहवाल मागविण्यात आलेला आहे विहीत मुदतीत आक्षेप प्राप्त नाहीत.

सदर प्रकरणी नगर रचना कार्यालय वाशिम यांना नाहरकत मागविण्यात आले असुन त्यांचे कार्यालयाचे पत्र क्र जाक बांध.परवानी/मौजे शेलगाव/गट क्र 31/प्लॉट क्र 6/ससंनरवा/728 दिनांक 19/11/2020 नुसार सदर अहवालातील अटी व शर्तीचे अधिन राहुन इमारतीचे बांधकाम सुरु करण्यास प्रारंभ प्रमाणपत्र देण्यासाठी शिफारस करण्यात आलेली आहे. त्यानुसार खालील अटी व शर्तींना अधिन राहुन सदर जागेमध्ये अर्जदार यांना निवासी व व्यापारी प्रयोनार्थ घराचे व दुकानाचे बांधकाम करण्याची नगर रचना कार्यालयाचे अहवालातील अटी व शर्ती चे अधिन राहुन इमारतीचे जोत्यापर्यंत इमारतीचे बांधकाम सुरु करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

अटी व शर्ती

01. बांधकाम परवानगी ही सहा महिण्यासाठी ग्राहय धरण्यात येईल.
02. बांधकामा करिता सादर केलेल्या नकाशात दर्शविल्या प्रमाणे बांधकाम झाले पाहिजे.
03. बांधकाम पूर्ण झाल्याबरोबर ग्रामपंचायतीला लेखी मोजमापासह कळविणे बंधनकारक राहील.
04. बांधकाम स्वत:च्या हद्दीतच करावे. बांधकाम करताना रहदारीस अडथळा होणार नाही याची दक्षता घ्यावी.
05. सांडपाण्याचा निचरा करण्या करिता आपणास स्वखर्चाने पक्की नाली बांधुन व्यवस्था करणे बंधनकारक राहील.
06. आपले ले आऊट नकाशात आपल्या प्लॉटचे तीन्ही बाजुस कमीत कमी 3 फुट अंतर सोडूनच व समोरील बाजुस 5 फुट अंतर सोडूनच बांधकाम करण्यात यावे.
07. आपल्या बांधकामामुळे कोणाच्याही हक्कास किंवा वहिवाटीस बाधा उत्पन्न झाल्यास ही परवानगी तात्काळ रद्द करण्याचा अधिकार राखुन ठेवण्यात आला आहे.
08. बांधकामामुळे ग्राम पंचायत रस्त्याचे /नालीचे नुकसान झाल्यास त्याची भरपाई करण्यात येईल.
09. बांधकाम चालु केल्याचा व पूर्ण झाल्याचा वेगळा रिपोर्ट देणे बंधनकारक राहील.
10. चालु बांधकामात कोणत्याही प्रकारचा फेरबदल या कार्यालयाचे पूर्व परवानगी शिवाय करु नये.
11. खाजगी अथवा सरकारी जागेवर अतिक्रमण करता कामा नये,अशा प्रकारे अतिक्रमण आपणाकडून झाल्यास त्याला आपण सर्वस्वी जबाबदार राहाल.
12. बांधकाम करताना संडास बांधकाम करावयाचे असल्यास संडास सेप्फटीक सिस्टीमचा असलाच पाहिजे.जेणे करुन घाण व सांडपाणी या पासून आजुबाजुच्या लोकांना त्रास होणार नाही तशा प्रकारची तक्रार असल्यास किंवा ग्राम पंचायतीला आढळल्यास आपणास नोटीस न देता आपला संडास केंव्हाही बंद करण्यात येईल.
13. संडास सफाई करताना 3 फुट सर्व्हिस लाईन सोडावयास पाहिजे.
14. विद्युत लाईनचा अडथळा बांधकाम करण्यास येत असल्यास महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाची रितसर परवानगी घ्यावी.

दिनांक 24/11/2020

Kishor Gade
तहसिलदार मंगरुळपीर

Office of the Tehsildar Mangrulpir

प्रतिलिपी :

सचिव ग्राम पंचायत, शेलगाव ता.मंगरुळपीर यांना माहिती तथा उचित कार्यवाही करिता अग्रेषीत.

Kishor Gade